Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 448 – 451
DOI: 10.5281/zenodo.10133966

Original Research Article

# महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य

प्रा. डॉ. माधव मंदेवाड

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शाहीर अण्णाभाऊसाठे महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड ४३१७१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: mmandewad@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

आजच्या काळात देखील महात्मा गांधी यांचे विचार अमर आहेत. आधुनिक जगात आजजी अस्थिरता निर्माण झाली आहे. त्यावर उपाय म्हणजे महात्मा गांधी यांचे विचार आत्मसात करणे हेच होय. महात्मा गांधी यांची विचारधारा ही सत्य अहिंसा ह्या तत्त्वावर आधारलेली होती. आज आपण पाहत आहोत की आधुनिक जगात हिंसा वाढत असून त्यातून तिसऱ्या महायुद्धाची चिन्हे आपल्या समोर दिसत आहेत. अशा परिस्थितीत महात्मा गांधी यांचे अहिंसावादी अहिंसावादी विचार हेच जगाला तारून नेणारे आहेत. महात्मा गांधी यांचे जीवन व कार्याचा संदेश जगातील प्रत्येक व्यक्तीला जगण्याची नवी प्रेरणा व ऊर्जा देते. नव समाज निर्मितीसाठी आणि नवराष्ट्र निर्मितीसाठी महात्मा गांधी ग्रामस्वराज्या संबंधीचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. महात्मा गांधी जगातील एक असे अद्वितीय व्यक्तिमत्व होते की प्रत्येकाने जीवन जगताना त्यांच्या विचारांची कास धरली तर एक आदर्श समाज निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. महात्मा गांधी यांच्या जीवना विषयीच्या अनेक पैलू पैकी साधी राहणी व उच्च विचारसरणी हा एक होता. त्याच बरोबर महात्मा गांधी यांनी स्वकार्याला फार महत्त्व देत होते, त्यांचे उदाहरण म्हणजे स्वतः खादी तयार करणे हे आहे. ग्रामीण समाजाच्या विकासासाठी व स्वावलंबनासाठी चरखा हे उपयुक्त साधन मानले. त्यातून समाजात श्रमाला प्रतिष्ठा मिळावी हा हेतू होता. त्यांच्या मते भारत देश हा खेड्यांनी बनलेला देश आहे. खरा भारत पाहायचा झाल्यास तो खेड्यांमध्ये दिसेल. त्यामुळे महात्मा गांधी म्हणायचे की "खेड्याकडे चला" खेडी सुधारली तर देश सुधारेल अशी त्यांची विचार श्रेणी होती. राष्ट्राचा विकास हा खेडी समृद्ध झाली तरच होईल अशी होती. ग्रामीण भाग जर नाहीसा झाला तर भारत देशाची सांस्कृतिक ओळख समाप्त होईल. म्हणून खेडी स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे प्रत्येक गाव हे स्वावलंबी व स्वयंपूर्ण झाले तरच देशाचा विकास होईल व महात्मा गांधी यांच्या यांच्या विचारातील ग्रामस्वराज्याची संकल्पना साकार होईल.

### संशोधनाची उद्दिष्टे

१. महात्मा गांधींची ग्राम स्वराज्य संकल्पना समजून घेणे.

२. महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे

३. सद्यस्थितीची आर्थिक परिस्थिती व गांधीजीच्या आर्थिक विचाराचे महत्त्व सांगणे

४. आदर्श खेड्याची संकल्पना समजून घेणे.

### संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध निबंधातील सर्व माहिती दुय्यम स्तोतावर आधारित आहे यासाठी क्रमिक पुस्तके मासिके वर्तमानपत्रे व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतलेला आहे.

### महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पना

महात्मा गांधीजी यांनी ग्रामस्वराज्य संबंधीची संकल्पना मांडली त्यात ते असे म्हणतात की ग्रामस्वराज्यामध्ये खेडी ही स्वावलंबी बनली पाहिजे. त्यातील समाज हा आत्मनिर्भर बनला पाहिजे तो दुसऱ्यावर अवलंबून राहता कामा नये. तो परस्परांच्या सहकार्यातून उन्नती करू शकेल. तो अन्न वस्त्र आणि निवारा स्वतःच तयार करणारा बनला पाहिजे. प्राचीन भारतात खेडी स्वयंपूर्ण होती. खेड्यातील उत्पन्न, उपभोग, वितरण या गोष्टी सर्व त्याच खेड्यात होत असे. त्यासाठी खेड्यातील व्यापार व उद्योग त्याच ठिकाणी होत असे. त्यामुळे प्राचीन भारतातील उद्दिम व्यापार वाढून खेडी आत्मनिर्भर होती. परंतु भारतात इंग्रजांची सत्ता आल्यानंतर भारतातील उद्योग व व्यापाऱ्याचा ऱ्हास झाला. कारण इंग्रजांनी भारतात पिकणारा कच्चामाल प्रदेशात घेऊन जाऊन त्यावर प्रक्रिया करून परत भारतातच विकण्यास सुरुवात केली. औद्योगिक उत्पादनातून तयार झालेला हा माल टिकाऊ होता. त्यामुळे ग्रामीण खेड्यात तयार झालेल्या मालाचा टिकाव त्यापुढे चालत नव्हता. त्यामुळे खेड्यातील उद्योग हे अडचणीत येऊन बंद पडले व ग्रामीण उद्योग व व्यापार कुंठीत झाला. व त्यामुळे खेडी पुन्हा भकास झाली. अशा अवस्थेत ग्रामीण खेडी आर्थिक दृष्ट्या संपन्न करावयाची असेल तर ग्रामीण भागात असणाऱ्या ज्या विविध समस्या जसे आरोग्य, दारिद्र्य, शिक्षण इत्यादी समस्या सोडवल्यास खेड्याचा विकास होईल. असा विश्वास गांधीजींना होता. गांधीजींच्या मते खेडे हा घटक खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण होण्यासाठी त्या खेड्यातील प्रत्येक व्यक्तीने प्रशासनात भाग घेतला पाहिजे. ग्राम स्वराज्याच्या संकल्पनेत गांधीजींनी आदर्श खेड्याची रचना केली प्रत्येक खेड्यात पाणी पुरवठ्याच्या सोयी, गुरांसाठी गोठे, खेळांची मैदानी सांडपाण्याची व्यवस्था, प्राथमिक शिक्षण अनिवार्य असावे, प्रशासनाचे काम पंचायतीकडे असावे. व्यक्तींच्या मूलभूत गरजा खेड्यातून भागविल्या जाव्यात. यासाठी खेडी स्वयंपूर्ण असावीत अशी महात्मा गांधी यांची विचारसरणी होती.

### आदर्श गाव / खेडे

भारतातील प्रत्येक गाव हे आदर्श असले पाहिजे. म. गांधींच्या मते ग्रामीण विकासासाठी मनोरंजन, पाणी यांची स्वतंत्र व्यवस्था व नियंत्रण व्हावे. सर्व कामे सहकारी तत्त्वावर चालावीत. जात पात व अस्पृश्यता नष्ट व्हावी. ग्रामराज्य, स्वतःची पंचायत, ग्राम सैन्य, अहिंसापूर्ण सत्याग्रह व असहकार हे एकमेव शासन शास्त्र असेल. गावातील लोकांचे आरोग्य निरोगी असावी यासाठी घरात भरपूर प्रकाश व मोकळी हवा असेल. गरजेच्या वस्तू गावाच्या आसपास किंवा पाच किलोमीटरच्या आत मिळाल्या पाहिजेत व घराच्या आसपास मागेपुढे मोकळी जागा असावी. त्यात त्यांना स्वतःसाठी भाजीपाला व फळांची झाडे लावता येईल. ग्रामीण भागात कला कुसरीचे उद्योग उभारावेत व त्यातून ग्रामीण बाजारपेठ तयार होईल व ग्राम समृद्ध होईल. गावाच्या कल्याणाचा विचार हा केंद्रस्थानी असला पाहिजे. महात्मा गांधी यांना वाटत असे की खेडी नष्ट झाली तर देश नष्ट होईल यासाठी कुठल्याही परिस्थितीत खेडी जिवंत राहिली पाहिजे असा विचार महात्मा गांधी यांचा होता.

**आदर्श खेड्याची वैशिष्ट्ये**

महात्मा गांधी यांनी आदर्श खेडे कसे असावे याबाबत काही वैशिष्ट्ये सांगितले आहेत ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. खेड्याची रचना व्यवस्था बद्ध असावी.
२. प्रत्येक खेडे अन्न व वस्त्राबाबत स्वयंपूर्ण असावे.
३. प्रत्येक खेडे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असावी.
४. प्रत्येक खेड्यात फुल झाडे, स्वच्छ रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था असावी.
५. प्रत्येक खेड्यातील कृषी व्यवसाय प्रगत असावा.
६. प्रत्येक खेड्यात गुरांसाठी गोठे, मुलांना खेळण्यासाठी मैदाने असावी.
७. खेड्यातील जमिनीमधून अन्नधान्याचे उत्पादन घेतल्यावर उरलेल्या जमिनीवर नगदी पिके घ्यावीत.
८. प्रत्येक खेड्यात मूलभूत शिक्षण सक्तीचे असावे.
९. खेड्यातील सर्व व्यवहार सहकारी तत्त्वानुसार चालविले जावेत.
१०. प्रत्येक खेड्यातील जातिव्यवस्था नष्ट व्हावी.
११. गावाचा कारभार दरवर्षी निवडून आलेल्या पाच सदस्यांच्या ग्रामपंचायतीमार्फत चालविला जावा.
१२. ग्रामपंचायतिला कायदे करण्याचे त्यांची अंमलबजावणी करण्याचे, न्यायालयीन अधिकार असावेत.
१३. खेड्यातील उत्पादन स्थानिक बाजारपेठेलाच उपलब्ध व्हावे.

**ग्रामोद्योग**

खेड्यामध्ये ग्राम उद्योग निर्माण झाले पाहिजे व लोकांच्या गरजा खेड्यातच पूर्ण झाल्या पाहिजेत त्यासाठी लोकांना प्रशिक्षण दिले पाहिजे. तेल, पेंड, तांदूळ, डाळी, मध खेळणी, चटण्या, साबण, कागद इत्यादी वस्तू खेड्यातच तयार झाल्या पाहिजेत. शेती कशी करावी याचे शिक्षण शेतकऱ्यांच्या मुलांना दिले पाहिजे. श्रमाला प्रतिष्ठा देणारे शिक्षण दिले तर खेड्यातील गरिबांची मुले आत्मनिर्भर होतील आणि त्यांच्या सुप्त शक्तीला चालना मिळून ते स्वतंत्र व्यवसाय करू शकतील ग्रामीण भागात उद्योग सुरू झाल्यास शेतीवरील असणारा भार कमी होईल असा विश्वास महात्म्य महात्मा गांधी यांना होता. ग्रामीण हस्त उद्योगांना मोठ्या यंत्राच्या स्पर्धेपासून वाचवले पाहिजे. तसेच खेड्यातील ग्राम उद्योगातील वस्तूंचा स्वीकार शहरवासी यांनी केला पाहिजे. असे गांधीजी आग्रहाने सांगतात. ग्राम उद्योगाचे मूळ स्वरूप कायम ठेवून त्यांच्या तंत्रात सुधारणा घडवून आणाव्यात कारागिरानी स्वतः खेड्यातजी यंत्रे, उपकरणे बनवता येतील ती बनवावील व खेडी स्वयंपूर्ण करावीत अशी अपेक्षा महात्मा गांधी यांना होती.

**खादी व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन**

महात्मा गांधी यांच्या मते ग्रामीण भागात कुटीर आणि लघु उद्योगाचा विकास व्हायचा असेल तर खादी ग्रामोद्योग वाढला पाहिजे त्यातून एक तर देशाला स्वदेशी मला उपलब्ध होईल. व त्यावर कापड उद्योग व शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव मिळेल व तो स्वावलंबी बनेल. खादीसाठी लागणाऱ्या कापूस उत्पादनाची संख्या वाढेल व कापूस सहज उपलब्ध होईल कापसावर आधारित इतर उद्योगात वाढ होईल जसे की कापसापासून सर्की काढणे, तेल घाणीचे उद्योगही कमी खर्चात घरच्या घरी करता येईल. यातून ग्रामीण भागातील वस्त्र उत्पादन वाढ होऊन खेडी संपूर्ण बनतील. महात्मा गांधीच्या मते भारतासारख्या राष्ट्रात लोकसंख्या वाढ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे येथे श्रमिकांची विपुलताही मोठ्या प्रमाणावर आहे. त्या ठिकाणी यंत्राचा वापर करून उद्योगांचे केंद्रीकरण करण्याऐवजी विकेंद्रीकरण केलेले असावे. लहान लहान उद्योग ग्रामीण भागात श्रमाच्या सहाय्याने सुरू केले जावेत. त्यांच्या मते प्राचीन काळात भारतात हस्तकला वस्तू, कापड ग्रामीण भागातच तयार होत असत. महात्मा गांधी यांच्या मते भारतासारख्या श्रम संपत्ती विपुल असलेल्या राष्ट्रात श्रमाच्या आधारे चालणारे उद्योग सुरू व्हावेत. असे उद्योग ग्रामीण भागात सुरू झाल्यास लोकांना रोजगाराचे साधन मिळेल. आणि ग्रामीण भागात शहराकडे जाणारा कामगारांच्या ओघ थांबेल.

**ग्रामीण शिक्षण**

महात्मा गांधी यांच्या मते आदर्श ग्राम बनविण्यासाठी ग्रामीण जनतेला ग्रामविकासा बद्दल जाणीव निर्माण होणारी शिक्षण पद्धती वापरली पाहिजे. खेड्यातील सार्वजनिक साफसफाई, स्वच्छता, आरोग्य रोगांचे निर्मूलन आपापसातील तंटे मिटणे व पशुसंवर्धन अशा कार्यक्रमांची योजना तयार करावी. शेतीमध्ये सहकार शेतीचा अवलंब करावा. त्यामुळे गावात नवप्रवर्तन होईल. सहकाराची जोड अहिंसा यावर आधारित असावी. सहकारी पद्धतीमध्ये शेतकरी आपली गुरे ही स्वतंत्र गोठ्यात बांधावी. कारण जनावरांच्या मलमूत्रामुळे आरोग्यास अपाय होण्याची शक्यता असते. सहकारी तत्त्वावरील गोरक्षणामुळे रोग झालेल्या गुरांवर औषध उपचार करणे सोपे जाईल. गुरांसाठी कुरणे राखून ठेवता येतील. खेड्यातील लोकांच्या गरजांना जास्तीत जास्त अनुकूल होण्यासारखे शिक्षण दिले पाहिजे. खेड्यातील शाळेला उद्योग शाळेचे रूप आले पाहिजे. शिक्षणाचा केंद्रबिंदू म्हणून ग्रामीण हस्त उद्योगाचे शिक्षण आवश्यक व महत्त्वाची मानले पाहिजे. खेड्यातील मुलांना हस्त उद्योगा मार्फत इतिहास, भूगोल, गणित, भाषा, चित्रकला, संगीत हे विषयही शिकवावेत. शिक्षणाच्या माध्यमातूनच मुला-मुलींना आपला शारीरिक मानसिक, भावनिक मुला-मुलींना आपला शारीरिक मानसिक भावनिक विकास करायला पाहिजे. महात्मा गांधी यांनी मुलांच्या भावनात्मक व क्रियात्मक विकासाबरोबरच चारित्र्याच्या जडणघडणीवर भर देतात. यामधून संयम, सदाचार, सत्याग्रह, स्वावलंबन, आत्मनिर्भरता या गुणांचा विकास होतो.

**सारांश**

महात्मा गांधी यांनी आपल्या ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडताना असे प्रतिपादीत करतात की खेड्याचा विकास झाला पाहिजे त्यातील कुठलाही घटक वंचित असता कामा नये. किंवा त्यांचे शोषण होऊ नये. खेड्यात ग्राम उद्योगांचा विकास होण्यासाठी लघु व कुटीर उद्योगाची भरभराट झाली पाहिजे. खेड्यात कुठलाही भेदभाव जात-पात वर्ग कलह असता कामा नये. म्हणून त्यांनी ग्राम उद्योगावर भर दिला. अतिरेकी यांत्रिकी करणाला विरोध केलेला दिसून येतो. त्याच बरोबर स्वदेशी चळवळ व श्रमाला प्रतिष्ठा मिळावी म्हणून ते स्वतः चरखा चालवत असत आणि आपले वस्त्र आपणच तयार करून धारण करायचे. याद्वारे श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. यावरून महात्मा गांधीजींचे विचार आजच्या 21 व्या शतकातही लागू पडणारे आहेत. 1991 च्या नवीन आर्थिक धोरणामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर बदलाव झालेला दिसतो. त्यामुळे श्रमिकांचे आणि गरिबांचे शोषण होत आहे. आणि मुठभर भांडवलदार वर्गाच्या हातात सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण होताना दिसते आहे. त्यामुळे आज भारतात गरीब व श्रीमंताची दरी वाढत चालली आहे. यातून मुक्त व्हायच्या असेल तर महात्मा गांधीचे विचार आजच्या परिस्थिती ही उपयोगाची ठरतात.

**संदर्भसूची**

१. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. रायखेलकर, प्रा. दामाजी

२. विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद 2022.

३. योजना मासिक ऑक्टोबर 2019

४. कुरुक्षेत्र मासिक ऑक्टोबर 2016

५. आर्थिक विचारांचा इतिहास प्रा. पी आर कुमानांचे.

६. https://puneresearch.com

७. http://agrowon.esakal.com